संशोधन आराखडा

नांदेड जिल्हयातील नगरपरिषदेच्या सफाई कर्मचाऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास.
(कालखंड 2010-11 ते 2020-21)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
मानव विज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषय पीएच.डी पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या प्रबंधाचा गोषवारा

सांशोधक

डोपेवाड आदिनाथ संग्राम
एम. ए. अर्थशास्त्र

मार्गदर्शक

प्रा. डॉ. डी. एस. काकडे

प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक अर्थशास्त्र विभाग
श्री दत्त कला व वाणिज्य महाविद्यालय हदगाव ता. हदगाव जि. नांदेड

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुलन
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ नांदेड

नांदेड जिल्हयातील नगरपरिषदेच्या सफाई कर्मचाऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास. (कालखंड 2010-11 ते 2020-21)

प्रस्तावना :-

प्राचीन काळापासून भारतामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेचे इतिहासात दाखले आपणास पहावयास मिळतात. वैदिक काळात गाव खेडे स्वयंपूर्ण घटक होता व तत्कालीन व्यवस्थेमध्ये पंचायती न्यायदानाचे काम सुद्धा पाहत होत्या. ग्रामीण भागात एकत्र येऊन गावातील समस्यावर विचारविनिमय करीत त्यासाठी गावातील प्रौढ नागरिकांची सभा बोलावली जात असे तिला ग्रामसभा म्हणत. वैदिक काळातील ग्रामसभेचा उल्लेख ऋग्वेदात आढळतो, ही ग्रामसभा मर्यादित लोकांच्या समितीचे मत असे या समितीच्या माध्यमातून पुढे गावातील पाच लोकांची पंचायत अस्तित्वात आली पुढे पंचायतीचे रूपांतर ग्रामपंचायतीमध्ये झाले तिची संरचना गावातील ग्रामस्थांच्या गरजेतून झाली होती.

महाभारतातील सभापर्व, जातक कथा, कौटिल्याचे अर्थशास्त्र, अशा ग्रंथांमध्ये ग्रामपंचायतीचा उल्लेख आढळतो यावरून ग्रामस्तरावर स्थानिक संस्था अस्तित्वात होत्या सभा, ग्रामणी, ग्रामवृद्ध, या संज्ञांनी त्यांचा उल्लेख केलेला आढळतो पुढे श्रेणी, जाती, कुळ, गण, इत्यादी संस्थांना महत्त्व प्राप्त झाले मात्र ग्रामिणीचे महत्त्व वाढले गुप्त काळापर्यंत (321-555) स्थानिक पंचायती राज्याची स्थिती होती या काळात ग्रामात नगरात न्यायदानाचे काम पंचायती करत. लोकांचे संरक्षण तंटा बखेडा यांचा निकाल सार्वजनिक काम, सरकारी महसूल गोळा करणे, इत्यादी कामे त्यांच्याकडे असत त्यांच्या सभासदास महत्तर म्हणत. कर्नाटकात रट्ट घराण्याच्या काळात (850-1250) खेड्यांची व्यवस्था ग्रामपंचायतीमार्फत केली जाई त्यांच्या सभासदांना महाजन असे म्हणत.

मराठी आमलात विशेषतः शिव काळात राजसत्तेच्या खालोखाल देशकसत्ता म्हणजेच देशमुख, कुलकर्णी, देश कुलकर्णी, पाटील, इत्यादी वतनदार मंडळी प्रांतातून असत गोत म्हणजे ग्रामसंस्था, या ग्राम संस्थेला फार महत्त्व होते. शिवकालीन ग्रामसंस्था कुटुंब तत्वावर आधारलेली होती. गावातील वतनाचे भांडण तंटे ग्राम संस्थेमार्फत निकाली काढण्याचा प्रत्यक्ष प्रधान जरी राजा असला: स्वतः अखेरचा न्यायाधीश असला तरी गोताच्या बहुमतावर निकाल होई. गावाचे वतनदार व पाटील गावाचे अनभिषिक्त राजाच असे त्यांच्यावर गावाच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी असे हीच व्यवस्था पेशवाईच्या अस्तापर्यंत अस्तित्वात असल्याचे आपणास लिखित स्वरूपात पाहावयास मिळते. ब्रिटिश आम्लाच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेत आमूलाग्र बदल झाला आणि अव्वल इंग्रजी आमदानीत (1858-1947) विद्‌यमान लोकनियुक्त स्थानिक स्वराज्य संस्थेचा उगम झाला. त्यामुळे ग्रामीण व शहरी जीवनात लक्षणीय बदल झाले.

तत्कालीन 1850 च्या कायद्‌याने ग्रामपंचायती पेक्षा मोठ्‌या शहरातून नगरपालिका स्थापन करण्याचा हक्क त्या त्या नगरातील लोकांना दिला त्यानुसार स्थानिक संस्थांची निर्मिती झाली तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेचा कालखंड एकूण पाच विभागांमध्ये विभागला गेला.1687 ते 1881, 1882 ते 1918, 1919 ते 1934,1935 ते 1949. भारतात स्थानिक शासनाची सुरुवात 1687 पासून झाली असे म्हणता येईल. त्यावर्षी मद्रास (आताचे चेन्नई)शहरासाठी महानगरपालिका स्थापन करण्यात आली परंतु त्यानंतर बरीच वर्षे स्थानिक शासनाच्या विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने विशेष हालचाली झाल्या नाहीत कारण या काळात भारतात ब्रिटिश सत्ता स्थिर झाल्या नव्हत्या त्यावेळेस ब्रिटिश सत्तेची स्थापन करण्याचा कालखंड होता. ईस्ट इंडिया कंपनीने सुरुवातीला येथे आपले आसन स्थिर करण्याच्या कामाला प्राधान्य दिले होते. स्थानिक शासनात महत्त्वाची हालचाल 1793 मध्ये करण्यात आली.

सन 1793 सनदी कायद्याने मद्रास (चेन्नई) कलकत्ता ची नियुक्ती करण्यात आली त्यांना काही गोष्टीवर कर बसवण्याचे अधिकार देण्यात आले तसेच शहर स्वच्छता आणि शांतता सुव्यवस्था रक्षण यासारख्या कामाची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली. 1882 साली लॉर्ड रिपन यांनी स्थानिक स्वराज्य संस्था बाबतीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले भारताच्या आधुनिक इतिहासामध्ये लॉर्ड रिपणने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या स्थापने बाबत केलेले प्रयत्न व त्याने संमत केलेला 1882 स्थानिक स्वराज्य संस्थेचा कायदा लक्षात घेता त्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे जनक आता म्हणता येईल. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या कमी असावी व जनतेचा प्रतिनिधी ची संख्या जास्त असावी कोणत्याही परिस्थितीत सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या 1/3 पेक्षा जास्त असता कामा नये. यामध्ये स्थानिक शासनामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय प्रशासना पासून दूर ठेवण्यात येईल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्याची पाहणी करण्यासाठी रॉयल विकेंद्रीकरणाचा आयोगाची नेमणूक सण 1906 मध्ये श्री हॉब हाऊस यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली या आयोगामार्फत अपयशाची कारणे शोधून त्यावर उपाय पण सुचवले. भारत सरकारचा ठराव सन 1915 मध्ये सरकारी अधिकारी जिल्हा लोकल बोर्डाचा अध्यक्ष नेमण्यात आला वित्तीय क्षेत्रात स्थानिक संस्थांना स्वातंत्र्य देण्यात आले नाही. सन-1917 मध्ये मॉटेग्यू चेम्सफर्ड ने भारतात जबाबदार सरकारची स्थापना व्हावी असा इंग्रज सरकारचा उद्देश असल्याचे घोषित केले.1918 साली काही घटनात्मक सुधारणा सुचविण्यात आल्या त्या निमित्ताने देशातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली.

महाराष्ट्र मध्ये राज्याच्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था संदर्भात अभ्यास करण्यासाठी तत्कालीन महसूल मंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली 1960 मध्ये समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने आंपला अहवाल 15 मार्च 1961 मध्ये सादर केला. तसेच राज्यातील पंचायत राज

व्यवस्थेच्या अंमलबजावणी तील त्रुटी शोधण्यासाठी व त्यावर उपायांसाठी महाराष्ट्र शासनाने श्री एल. एन. बोंगिरवार यांच्या अध्यक्षतेखाली 2 एप्रिल 1970 मध्ये समितीची स्थापना करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्था यांचा अभ्यास करण्यासाठी वेळोवेळी वेगवेगळ्या समित्या गठित करण्यात आल्या.

स्थापना	**समिती**
12 डिसेंबर 1977	अशोक मेहता समिती
18 जुन 1984	पी.बी.पाटील समिती
26 मार्च 1985	श्री.जी.व्ही. के.राव समिती
1986	डॉ.एल.एम.सिंघवी समिती

अशा प्रकारे विविध समित्या गठीत करून प्रभावी कार्य करण्यासाठी नेहमी मूल्यमापन करण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थेला घटनात्मक दर्जा 1993 साली 73 वी व 74 वी घटना दुरुस्ती करून प्राप्त झालेला आहे या घटनादुरुस्तीमुळे कार्यकाल सर्व घटकांना प्रतिनिधित्व उत्पन्नाचे वितरण करण्यासाठी राज्य वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली.

स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रकार

ग्रामीण	**शहरी**
1) जिल्हा परिषद	1) महानगरपालिका
2) पंचायत समिती	2) नगरपरिषद
3) ग्रामपंचायत	3) कटकमंडळे
4) नगरक्षेत्र समिती	

शहरी स्थानिक शासन संस्था मध्ये नगरपंचायत नगरपरिषद महानगरपालिका समोर यांचा समावेश होतो. आपल्या देशात शहरांची संख्या खूप आहे शहरे झपाट्याने वाढत आहेत गावांची निमशहरे, निमशहरांची शहरे आणि शहरांची महानगरे होत आहेत.शहरांच्या आजूबाजूला असणाऱ्या ग्रामीण भागाचेही स्वरूप बदलत आहे.

शहरातील सोयी सविधा व समस्या

सुविधा	समस्या
1) उद्योग व्यवसायाच्या संधी	1) अपुरा निवारा
2) वाढते सेवाक्षेत्र	2) जागेची टंचाई
3) मोठ्या प्रमाणावर रोजगार	3) वाहतूक कोंडी
4) मनोरंजन, कला,साहित्य, इत्यादी सोई उपलब्ध	4) कचऱ्याच्या विल्हेवाटाची समस्या
	5) वाढती गुन्हेगारी

नगरपंचायत :-

शहर होण्याच्या प्रक्रियेत जी गावे असतात त्यांना नगरपंचायत असते त्यास खेडे म्हणता येत नाही व शहरी म्हणता येत नाही अशा स्थितीतील ठिकाणास नगरपंचायत म्हणतात आणि स्थानिक संस्था प्रमाणे दर पाच वर्षाने नगरपंचायतीची निवडणूक होते निवडून आलेले प्रतिनिधी आपल्यापैकी एकाची अध्यक्ष आणि एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करतात.

नगरपरिषद:-

छोट्या शहराच्या आणि नगराच्या प्रशासनासाठी नगरपालिकेची स्थापना केली जाते महानगरपालिका प्रमाणेच याची स्थापना मध्ये संबंधित राज्य विधिमंडळाच्या कायद्यान्वये व संघराज्य प्रदेशांमध्ये भारतीय संसदेच्या कायद्यान्वये होते.

नगर परिषद, नगर समिती, नगर मंडळ, शहर पालिका इत्यादी विविध नावांनी नगरपालिका ओळखली जाते महानगरपालिकेप्रमाणेच नगरपालिकेत सुद्धा परिषद स्थायी समित्या स्थायी समित्या मुख्य कार्यकारी अधिकारी हे तीन प्रज्ञा अधिकारी वर्ग असतात परिषदेचे नगरपालिका चे विचारविनिमय करणारे आणि कायदे करणारे अंग आहे दहा हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरी

भागात नगर परिषदेची स्थापना केली जाते नगरपरिषदेचे ‘अ’, ‘ब’, ‘क’ असे तीन वर्ग करण्यात आले आहेत.

नगरपरिषद वर्ग	**लोकसंख्या**
अ वर्ग नगरपरिषद	75000 पेक्षा जास्त
ब वर्ग नगरपरिषद	30000 ते 75000
क वर्ग नगरपरिषद	10000 ते 30000

नगरपरिषदेवर प्रौढ मतदान पद्धतीने उमेदवार निवडून दिले जातात नगरपरिषदे वरील सदस्यास नगरसेवक म्हणतात. नगरसेवकातून एकाची नगराध्यक्ष म्हणून निवड केली जाते. नगरपरिषदेचा कालावधी पाच वर्षाचा असतो नगराध्यक्ष चा कालावधी अडीच वर्षाचा असतो नगराध्यक्षावर आणला गेलेला अविश्वास ठराव एखादा फेटाळला गेल्यास दुसरा अविश्वास ठराव मांडण्यासाठी किमान 50% नगरसेवकाची अनुमती लागते नगराध्यक्षा वरील अविश्वास ठराव पास होण्यासाठी 3/4 बहुमताची आवश्यकता असते. नगरपरिषदेचे वार्ड जिल्हाधिकारी निर्माण करतात. नगर परिषद बरखास्त करण्याचा अधिकार राज्य शासनास असतो.

सध्या महाराष्ट्रात 255 नगरपरिषद आहेत.

अ.क्र.	**पालिका**	**संख्या**
1	महानगरपालिका	28
2	अ' वर्ग नगरपरिषद	17
3	ब' वर्ग नगरपरिषद	73
4	क' वर्ग नगरपरिषद	144
5	नगरपंचायती	125
	एकूण	**387**

नगरपरिषद योजना:-

रस्ता अनुदान नाविन्यपूर्ण योजना विशेष रस्ता अनुदान योजना, वैशिष्ट्यपूर्ण योजना, दलित वस्ती योजना, रमाई आवास योजना, दलितेतर योजना, 14 वा वित्त आयोग,15 वा वित्त आयोग, प्रधानमंत्री आवास योजना,नगरोत्थान योजना,दिव्यांग निधी, नागरी शहरी उपजीविका अभियान, केंद्रशासन पुरस्कृत लहान मध्यम शहराकरिता पायाभूत सुविधांचा विकास कार्यक्रम परिशिष्ट्ये-12 मध्ये नगरपालिकांच्या अधिकार क्षेत्रात सोपविण्यात आलेली 18 कामे

1) नगर नियोजनाचा व नागरी क्षेत्र विनियोजन.

2) जमिनीचा वापर आणि इमारत बांधणीचे नियंत्रण.

3) आर्थिक आणि सामाजिक विकासाचे नियोजन.

4) रस्ते आणि पूल.

5) घरगुती औद्योगिक आणि व्यापारी उद्दिष्टासाठी पाणीपुरवठा

6) अग्निशमन सेवा.

7) सार्वजनिक आरोग्य,सफाई स्वच्छता ,सफाई आणि घनकचरा व्यवस्थापन.

8) नागरी वनीकरण पर्यावरणाचे जतन आणि परिस्थितिकीय घटकांचे संवर्धन.

9) अपंग व मतिमंद व्यक्ती सहीत समाजातील दुर्बल घटकांच्या हिताचे संरक्षण करणे.

10) गलिच्छ वस्ती सुधारणा व तिचा दर्जा सुधारणे

11) नागरी दारिद्र्य निर्मूलन.

12) उद्याने बागे, क्रीडांगणे अशा नागरी सेवा व सोयी पुरवणे.

13) सांस्कृतिक, शैक्षणिक आणि कलात्मक पैलूंना चालना देणे.

14) दफन व दफनभूमी आणि विद्युत वाहिनी.

15) जनावरांसाठी कोंडवाडा पशु संबंधित कोऱ्यावर बंदी आणणे.

16) जन्म-मृत्यूची नोंदणी व जीवन विषयक आकडेवारी.

17) रस्त्यावरील दिवाबत्ती,वाहन तळे, बस थांबे आणि सार्वजनिक सुविधा अशा सार्वजनिक सोयी सुविधा.

18) कत्तल खाना आणि कातडी कमावण्याचे कारखान्यांचे नियोजन.

समस्यासूत्रण :-

नगरपरिषदेतील सफाई कर्मचारी हा सर्वात निम्नस्थरीय वर्गात मोडत असतो. त्याचबरोबर शिक्षण आणि उत्पनाच्या बाबतीतही तो नेहमीच मागास आढळून येते. एकंदरीत अल्प उत्पन्नातुन तो आपल्या मूलभूत गरजाबरोबरच जीवनावश्यक गरजांवर खर्च करत असतांना चैनीच्या गरजापासून तर तो नेहमी कोसोदूर असतो.त्यामुळे शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, कुटुंब या घटकांवर आपले उत्पन्न खर्च करताना त्याच्यासमोर अनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळे सफाई कामगार आपल्या मुलांना उच्च दर्जाचे देऊ शकत नाहीत ना कधी आरोग्याच्या समस्यांतून मुक्त झालेला आढळून येत नाही. अल्प वेतनावर चालणारे त्याचे उदरनिर्वाह हा एक संशोधनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे नेहमीच आर्थिक समस्यांनी ग्रासलेल्या नगरपरिषदेतील सफाई कामगारांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा शोध घेऊन त्यावर उपाय योजनेच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत शोधप्रबंधातून अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधन आराखडा :

संशोधन उद्देशाची प्राप्ती करण्यासाठी आणि संशोधनाला सुयोग्य दिशा देण्यासाठी संशोधन आराखडा तयार केला जातो.संशोधन समस्येचा विचारपूर्वक अंदाज घेऊन त्या संशोधन आराखड्याचे स्वरूप निश्चित कराव लागते प्रत्यक्ष संशोधन आराखड्याचे विशेष महत्व आहे.प्रस्तुत संशोधनाचा उद्देश नांदेड जिल्ह्यातील नगरपरिषदेच्या सफाई कर्मचाऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे असल्याने वर्णनात्मक संशोधनं आराखड्याचा अवलंब करण्यात आलेला आहे. त्यानुसार संशोधनाची दिशा ठरवून तथ्य संकलनासाठी बहुतांशी व

अंशतः अध्ययन केले आहे व त्याआधारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण केले आहे.

अध्ययनाचे महत्व:

कोरोणा काळाच्या भयावह परिस्थिती मध्ये सफाई कर्मचारी कोणतीही भीती न बाळगता नगर सफाईचे काम केले. आरोग्य क्षेत्रातील डॉक्टर नर्स तथा सफाई कर्मचारी पुढे होऊन कार्य केले या भीतीच्या वातावरणामध्ये ही त्यांनी स्वतःच्या आरोग्याची तमा न बाळगता व आपल्या कुटुंबाचा विचार न करता या कोरोना महामारी चा सामना त्यांनी केला पण इतके कार्य करत असताना त्यांच्या पाल्यासाठी सरकारकडून शासकीय योजनेद्वारे त्यांना आर्थिक सहाय्य भेटले का व सरकारकडून त्यांना आर्थिक साहेब मंजूर झाला असेल तरी तो आर्थिक सहाय्य त्यांच्यापर्यंत पोहोचला आहे का त्याची अंमलबजावणी झाली का हे पण पहाणे गरजेचे वाटते. जर सफाई कर्मचारी त्यांच्या आर्थिक समस्यांसाठी दोन दिवस जर उपोषणास बसतील तर पूर्ण नगरमध्ये घाणीचा घाणीचे सामाज्य पसरेल. इतके महत्व सफाई कर्मचारी यांना आहे. तरी त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास झाल्याचे जास्त प्रमाणात दिसून येत नाही. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील नगरपरिषदेतील सफाई कर्मचारी यांच्या आर्थिक व सामाजिक स्थिती चे अध्ययन करणे महत्वाचे वाटत.

उदिष्टे :-

1) नांदेड जिल्ह्यातील नगरपरिषदांचा अभ्यास करणे.

2) नगरपरिषदेच्या उत्पन्न व खर्चाचा अभ्यास करणे .

3) नगरपरिषदेतील कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा अभ्यास करणे.

4) नगरपरिषदे अंतर्गत काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

5) नगर परिषद अंतर्गत काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

6) नगरपरिषदेमध्ये सफाई कर्मचारी म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर होणारा परिणाम अभ्यासणे.

7) नगरपरिषदेमध्ये सफाई कर्मचारी म्हणून काम करत असताना येणाऱ्या समस्याचे अध्ययन करणे.

गृहितके:

1) सफाई कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती चांगली नसते.

2) सफाई कर्मचाऱ्यांचे वेळेवर वेतन होत नाही.

3) सफाई कर्मचारी शिक्षणाबद्दल जागरुक नसतात.

4) नगर परिषद सफाई कर्मचारी त्यांच्यामध्ये आरोग्य बद्दल उदासीनता असते.

5) कमी वेतन असल्यामुळे ते मुलांना शिक्षणासाठी पैसा पुरवू शकत नाहीत.

6) नगरपरिषदेचे सफाई कर्मचारी यांना त्यांच्या कामानुसार वेतन मिळत नाही.

7) सफाई कर्मचारी नागरी भागात राहून सुद्धा त्यांच्या आर्थिक व शैक्षणिक विकास झालेला नाही.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधनासाठी नांदेड जिल्ह्यातील सर्व नगरपरिषदेतील व नगरपंचायततेतील सफाई कर्मचाऱ्यांचा आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक माहितीचा वापर करण्यात येईल. प्रत्येक नगरपरिषदेतील 10% सफाई कर्मचाऱ्यांची निवड करून त्यांना प्रत्यक्ष भेटून मुलाखत अनुसूची दवारे माहिती संग्रहित करून निष्कर्ष काढले जातील. माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी विविध सांख्यिकीय तंत्राचा वापर केला जाईल तसेच सफाई कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा अभ्यास करण्यासाठी द्वीतीय सामग्रीचा वापर केला जाईल यासाठी नगरपरिषदेतील अहवाल व अंकेक्षण अहवाल उत्पन्न खर्च ताळेबंद शासन निर्णय शासकीय धोरणे इत्यादींच्या आधारे प्रस्तुत संशोधन केले जाईल.

तथ्य संकलन :

• प्रस्तूत शोधप्रबंधाच्या अभ्यासाठी तथ्य संकलनाच्या दोन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

यात प्राथमिक तथ्य संकलन आणि दुय्यम तथ्य सकलनाचा वापर करण्यात येणार आहे.

१) **प्राथमिक तथ्य सकलनः-**

विषयानुसार अचूक माहिती संकलित करण्यासाठी प्राथमिक तथ्य सकलन पध्दतीचा उपयोग करण्यात येणार आहे. नांदेड जिल्हयात नगरपरिषदेतील सफाई कामगाराना प्रत्यक्ष भेटून त्यांची मुलाखत घेऊन त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थिती संदर्भात प्रश्नावली, यादृचिक पद्धतीनुसार माहिती घेऊन प्राथमिक तथ्य संकलित करण्यात येणार आहेत.

2) **दुय्यम तथ्य संकलनः-**

विषयाच्या अनुषंगाने तथ्य संकलनासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात येणार आहे.यामध्ये अर्थशास्त्राची अनेक ग्रंथ, संशोधन पद्धतीचे ग्रंथ, , विविध दैनिक, मासिका मधील माहिती, लेख व नगरपरिषदेते संदर्भातील विविध शासकीय दस्तऐवज तसेच इंटरनेटवरील माहिती. वेबसाईट्स, समाज माध्यमावर प्रकाशित झालेली माहिती लेख इत्यादी द्वारा माहिती घेऊन तथ्य संकलित करण्यात येणार आहे.

नमूना निवड :

नांदेड जिल्हयात एकूण 11 नगरपरिषदा आहेत तर 4 नगरपंचायती आहेत. प्रस्तुत अभ्यासासाठी या नगरपरिषदेअंतर्गत काम करणाऱ्या सफाई कामगारांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यात येणार आहे. यासाठी 300 कामगारांची प्रश्नावलीद्वारे तथ्ये गोळा केली जाणार आहेत. यासाठी यादृचिक पध्दतीने माहीत संकलीत करण्यात येणार आहे

अध्ययनाचा कालखंड :-

संशोधकाने अध्ययनाचा कालखंड 2010-11 ते 2020-21 हा निवडलेला आहे

अध्ययनाची मर्यादा:

नांदेड जिल्हयातील नगरपरिषद देगलूर, बिलोली, मुखेड, मुदखेड, उमरी, धर्माबाद, हदगाव, किनवट, कंधार, लोहा, भोकर व नगरपंचायती अर्धापुर, माहूर, नायगाव, हिमायतनगर असा मर्यादित क्षेत्र निवडण्यात आला आहे.

प्रकरणाची रूपरेषा :-

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी प्रकरणाची मांडणी खालील पद्धती करण्यात येणार आहे.

1) **प्रकरण पहिले :- प्रस्तावना**

विषय प्रवेशाच्या या प्रकरणात सादर विषयाच्या अनुषंगाने माहितीची अभ्यासात्मक पायाभरणी करण्यात येणार आहे.

2) **प्रकरण दुसरे :-पूर्व संशोधन साहित्याचा आढावा**

अभ्यासाचे हे दुसरे प्रकरण असल्याने यापूर्वी प्रकाशित झालेल्या साहित्याच्या आढावा घेतला जाणार आहे. त्यामुळे या प्रकरणात संशोधन विषयाची व्याप्ती, दिशा स्पष्ट होणार आहे. त्या अनुषंगाने हे प्रकरण असणार आहे. तसेच संशोधनासाठी उपयुक्त असलेल्या संशोधन पद्धतीचा आढावा उद्दिष्टे, गृहीत कृत्य, संशोधन आराखडा, नमुना निवड व तथ्याची माहिती या आधारे ही संशोधनाची विश्लेषण करण्यात येणार आहे.

3) **प्रकरण तिसरे :- नांदेड जिल्हयातील नगर परिषदेचा व नगरपंचायतीचा अभ्यास भारत आणि महाराष्ट्र**

राज्यातील प्रस्तुत संशोधनाच्या आधार घेऊन भारत आणि महाराष्ट्र राज्यातील नगरपरिषद व नगरपंचायतीच्या सफाई कामगारांच्या आर्थिक व सामाजिक स्थिती चा अभ्यास करण्यात येणार आहे.

3) **प्रकरण चौथे :- सफाई कर्मचाऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास**

अभ्यासाचे हे महत्त्वपूर्ण प्रकरण असल्याने यात नांदेड जिल्हयात नगरपरिषद व नगरपंचायत विभागाअंतर्गत येणाऱ्या सफाई कामगारांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

4) **प्रकरण पाचवे :- निष्कर्ष व शिफारशी**

सफाई कामगारांचा थोडक्यात आढावा घेऊन त्यांच्या समस्याची कारण मी मासा करून विविध निकष काढण्यात येतील अनेक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी विविध उपाय करून प्रस्तुत संशोधनातून शिफारशी करण्यात येते.

- **संदर्भसूची**
- **परिशिष्टे**

संदर्भ साहित्य :-

1) आगलावे डॉ. प्रदीप, 2020, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्र, विद्या प्रकाशन नागपूर.

2) बोधनकर डॉ.सुधीर, अलोणी प्रा.विवेक, 1999, सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर,

5) जाधव डॉ.सुनिल, 2012, सामाजिक संशोधन पद्धती, प्रथमावृत्ती

6) देशमुख राम, 2005, मूलभूत सांख्यिकी, विद्या प्रकाशन, नागपूर,

7) इकॉनॉमिक्स सर्वे ऑफ महाराष्ट्र 2018 - 19

8) इंडियन रोड इंडस्ट्री रिपोर्ट,

9) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2020

10) महाराष्ट्र आर्थिक आकडेवारी 2020

11) शासकीय कर्मचाऱ्यांचा चौकशी माहिती कोश 2015 अहवाल

12) Directorate of economics and statistics

13) नगर परिषद प्रशासन संचालनालय महाराष्ट्र शासन (mahadma.maharastra.gov.in)

14) महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट (www. Maharashtra.gov.in)

15) जिल्हयाची अधिकृत वेबसाईट (www.nanded .nic.in)

16) हावा अश्विनकुमार गुरुनाथ, 16 ऑगस्ट 2017, लातूर जिल्हयातील नगरपालिकेचा आर्थिक स्थितीचा अभ्यास, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड.

17) यमलवाड प्रा. गोविंद, 1999, स्थानिक स्वराज्य संस्था, कल्पना प्रकाशन, प्रथमावृत्ती.

18) ठक्कर प्रा.के.एच., 2001, बारावीचे अर्थशास्त्र, प्रगती प्रकाशन, गिरगाव, मुंबई.

संशोधक
आदिनाथ संग्राम डोपेवाड
एम.ए.(अर्थशास्त्र)

मार्गदर्शक
प्रा.डॉ.डी.एस.काकडे
श्री दत्त महाविद्यालय, हदगाव